मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | सोमवार, दि. 16 सप्टेंबर 2024 | पान- 1

# विद्यार्थ्यांना महापालिकेत प्रशिक्षणाची संधी

**युवकांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव देऊन त्यांच्यात रोजगार क्षमता निर्माण : महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

युवकांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव देऊन त्यांच्यात रोजगार क्षमता निर्माण करण्यासाठी महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. त्यानुसार शहरातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन महापालिकेत काम करण्यासाठी नोकरीची संधी देण्यात आली आहे. यामध्ये पालिकेच्या आस्थापनेवर विविध विभागात १६२ विद्यार्थी रुजू झाले असून १२० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. या विद्यार्थ्यांना पालिकेत प्रशिक्षणासह रोजगाराची संधी मिळाली आहे.

महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत १२ वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या सुमारे ५७५ युवकांना प्रशिक्षणासाठी संधी देण्यात येत आहे. पालिकेच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या एकूण पदांच्या ५ टक्के पदे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तात्पुरत्या कालावधीसाठी भरण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळवण्यास, उद्यमशीलता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली आहे.



या योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना विद्यावेतन दिले जात आहे. त्यामध्ये १२ वी उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ६ हजार , आयटीआय किंवा पदविका उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ८ हजार तसेच पदवी किंवा पदव्युत्तर पदवीधारक उमेदवाराला दरमहा १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येते.

### आणखी 254 पदे भरणार

» महापालिकेच्या विविध विभागात केवळ १६२ विद्यार्थी रुजू झाले असून १२० जणांनी नावनोंदणी केलेली आहे. मात्र, फिल्ड सर्व्हे इन्युमरेटर, माळी, मल्टी टास्किंग स्टाफ, स्थापत्य अभियंता अशा विविध पदांसाठी ५७५ उमेदवारांपैकी ३२१ उमेदवार आले होते. त्यामुळे अजून २५४ पदे भरण्याची आवश्यकता आहे.

> “ युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन महापालिकेत काम करण्यासाठी नोकरीची संधी दिली आहे. यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवण्यात आली आहे. विविध पदांच्या एकूण १६२ उमेदवारांना ६ महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीसाठी नियुक्त केले आहे. या उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार विद्यावेतन देण्यात येणार आहे..
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग.

## इंद्रायणीनगरची शांतता, सलोखा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणार : अजित गव्हाणे

**कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून दिसला परिवर्तनाचा जागर**

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणीनगर येथील शांतता व सलोखा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अजित गव्हाणे म्हणाले. इंद्रायणी नगर भागामध्ये सार्वजनिक गणपती मंडळांच्या बाप्पांचे दर्शन घेऊन त्यांनी बाप्पांची आरती केली. यावेळी त्यांना मंडळांच्या कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. रात्री उशिरापर्यंत मंडळाच्या कार्यकर्त्यांशी अजित गव्हाणे यांनी संवाद साधला. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून यंदा परिवर्तनाचा जागर होणार असल्याचे चित्र दिसून येत होते.

बाप्पांची आरती करत गव्हाणे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद देखील साधला. या संवादातून इंद्रायणीनगर भागातील समस्या, नागरिकांचे प्रश्न, व्यापारी लघुउद्योजक यांच्याकडून आलेल्या सूचना गव्हाणे यांनी ऐकून घेतल्या. इंद्रायणीनगर येथील शांतता सलोखा आपल्याला कायम टिकवून ठेवायचा आहे असे देखील गव्हाणे यांनी नागरिकांना आश्वस्थ केले.



अजित गव्हाणे यावेळी कार्यकर्त्यांशी बोलताना म्हणाले इंद्रायणी नगर हे येथील नियोजन, व्यवस्थापन आणि महत्वाचे म्हणजे शांततेसाठी ओळखले जाते. ही शांतता गेल्या दहा वर्षात हरवली आहे अशा नागरिकांच्या तक्रारी त्यांच्या गाठीभेटी घेताना दिसून येतात. आपण सर्वांनी एकत्र येत इंद्रायणीनगर मधील शांतता आणि सलोखा टिकून ठेवायचा आहे यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे गव्हाणे यावेळी म्हणाले. इंद्रायणी नगर भागातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतीचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दर्शन केले. यावेळी माजी नगरसेवक संजय वाबळे, विक्रांत लांडे तसेच संजय उदावंत, विजय पिरंगुटे, माणिक जैद, विठ्ठल माने, दत्तात्रय दिवटे, पांडुरंग सांडभोर, प्रमोद शिरसाठ, मोहन टाकळकर, अशोक तनपुरे, बाळासाहेब पवार बाळासाहेब जाधव, राजू देशपांडे, दादा कांडेकर, मधुकर गुंजकर, लक्ष्मण नगरे, उपस्थित होते.

## ‘इस्त्रो’मधील शास्त्रज्ञ तेजस्वी शिंदे ही पिंपरी-चिंचवडकरांचा अभिमान!

**भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या भावना, अभियांत्रिकी विद्यार्थी ते अंतराळापर्यंतचा प्रवास प्रेरणादायी**

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वसामान्य कामगार कुटुंबात जन्माला आलेली तेजस्वी शिंदे हिने अभियांत्रिकी शाखेची विद्यार्थीनी ते अंतराळ संशोधनापर्यंतचा प्रवास यशस्वी केला आहे. पिंपरी-चिंचवडकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे, अशी भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

भोसरी येथील तेजस्वी शिंदे ही विद्यार्थिनी राष्ट्रीय वैमानिक आणि अंतराळ प्रशासन (NASA) मधील कॉन्फरन्स यशस्वी पूर्ण केली. युएसएमधील कॉलोराडो येथे तिची पोस्ट डॉक्टरल साठी निवड झाली आहे. आज तेजस्वी शिंदे भारतात परतली. त्यावेळी कुटुंबियांसह आमदार लांडगे यांनी तिचे निवासस्थानी स्वागत केले. यावेळी तिचे आई-वडील आणि कुटुंबीय उपस्थित होते.

तेजस्वी शिंदे हिच्या प्रवासाची सुरुवात मेकॅनिकल इंजिनीअरिंगमधील बॅचलरची विद्यार्थिनी म्हणून झाली. तिला अंतराळ संशोधनाची आवड होती. इस्त्रोचे संचालक डॉ. ए.एस. किरणकुमार यांनी तिची स्पेस सेक्टरमध्ये निवड केली. एका वर्षानंतर, तिची सीएनआरएस, फ्रान्स येथे संचालक डॉ. स्टीफन मुझाफिओर यांनी निवड केली. ज्यामुळे तिला युनिव्हर्सिटी ऑफ साउथॅम्प्टन, यूके येथे एमएससी करण्याची संधी मिळाली.



> “ एका सामान्य कामगाराच्या मुलीची गरुडझेप प्रेरणादायी आहे. 2024 मध्ये तेजस्वी शिंदे हिच्या महत्त्वपूर्ण कार्यामुळे तिला “ यूएस एअर फोर्स डिफेन्स अनुदान* द्वारे प्रायोजित कोलोरॅडो विद्यापीठात *पोस्ट डॉक्टरल” संशोधक पद मिळाले आहे. इस्त्रो ते आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संशोधनापर्यंत, तेजस्वीचा प्रवास भावी पिढीसाठी आदर्श आणि पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

# चिकुनगुनियाच्या नव्या अवतारामुळे डॉक्टरदेखील गोंधळात

## चिकुनगुनिया विषाणूच्या नवीन प्रकाराने संपूर्ण शहरात कहर केला आहे, हा आजार इतिहासात पहिल्यांदाच भयावह, जीवघेणी लक्षणे दाखवत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

चिकुनगुनिया विषाणूच्या नवीन प्रकाराने संपूर्ण शहरात कहर केला आहे. हा आजार इतिहासात पहिल्यांदाच भयावह, जीवघेणी लक्षणे दाखवत आहे. चिंतेची बाब म्हणजे, यात अर्धांगवायूसारख्या गंभीर आजाराचाही समावेश आहे. चिकुनगुनियाच्या या धोकादायक अवतारामुळे डॉक्टरदेखील गोंधळले आहेत.

संसर्गजन्य रोगतज्ज्ञांनी तातडीने राष्ट्रीय विषाणू संस्थेकडे (एनआयव्ही) या प्रकरणी हस्तक्षेपाची मागणी केली आहे. तसेच चिकुनगुनियाच्या विषाणूच्या नव्या प्रकाराबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे.

पुण्यातील संसर्गजन्य रोगतज्ज्ञांच्या मते, एकेकाळी सांधेदुखी आणि ताप यासाठी ओळखला जाणारा चिकुनगुनिया आता मोठी आणि धोकादायक लक्षणे दाखवत आहे. यापूर्वी दोन हजाराहून अधिक प्रकरणे नोंदवलेल्या शहरात यापूर्वी कधीही न पाहिलेली लक्षणे आता या आजारात दिसत आहेत. हा विषाणू डेंगीची नक्कल करत असल्याचा दावा केला जात आहे. त्याच्या विचित्र लक्षणांमुळे आता डॉक्टरदेखील गोंधळले आहेत.

राष्ट्रीय डेंगीतज्ज्ञ आणि केईएम हॉस्पिटलमधील आयसीयू आणि डेंगी विभागाचे प्रमुख डॉ. राजेश गादिया यांनी या संदर्भात 'सीविक मिरर'सोबत बोलताना सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, "या लक्षणांपैकी सर्वात धक्कादायक लक्षण म्हणजे नाक काळे पडणे. भूतकाळातील चिकुनगुनियाचा या वैशिष्ट्याशी कधीही संबंध नाही. हे पाहता आताचा चिकुनगुनिया अधिक चिंताजनक आहे. या लक्षणामुळे रुग्णांना सुमारे दोन आठवडे चालणे-फिरणेदेखील कठीण होत आहे.याची लागण झालेल्यांपैकी सुमारे २० टक्के रुग्णांचे नाक काळे झालेले आढळले. हे यापूर्वी कधीही दिसून आले नव्हते. यामुळे रुग्णांना घराबाहेर पडण्यास संकोच वाटत आहे."

हे भयंकर परिवर्तन कशामुळे झाले हे निर्धारित करण्यासाठी गादिया आणि द्रविड यांनी सध्याच्या चिकुनगुनियाच्या स्ट्रेनच्या अधिकृत क्रमवारीची विनंती केली आहे. 'एनआयव्ही'च्या हस्तक्षेपाशिवाय परिस्थिती आणखी बिघडू शकते आणि हिवाळा सुरू होईपर्यंत चालू राहू शकते, असा इशारा देतानाच या डॉक्टरांनी त्यांच्या सहकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आणि चिकुनगुनिया आणि डेंग्यूमधील फरक ओळखण्यासाठी लवकर तपासण्याचे आवाहन केले आहे.



### अर्धांगवायूची लक्षणे

» "रुग्णांच्या मज्जातंतूचे नुकसान होत आहे आणि अनेकांना अर्धांगवायू होत आहे. माझ्या ओपीडीमध्ये याच्या दररोज सरासरी ३० नवीन केसेस येत आहेत. गेल्या सहा ते आठ आठवड्यात एक हजाराहून अधिक चिकुनगुनियाचे रुग्ण मी तपासले आहेत. यापूर्वी कधीच अशी परिस्थिती उद्भवली नव्हती. चिकुनगुनियाच्या या नव्या गंभीर प्रकाराचे रुग्ण इतक्या जास्त प्रमाणावर आहेत की, त्यामुळे डॉक्टर मेटाकुटीस आले आहेत. वाघोली, प्रभात रोड, चंदननगर, हडपसर, बीटी कवडे रोड, कल्याणीनगर, आळंदी, मोशी, चाकण आणि भोसरी यासारख्या भागात अनेक कुटुंबांमध्ये याची लागण मोठ्या प्रमाणावर झाली आहे," असे सांगताना शहरावरील चिकुनगुनियाची पकड दिवसेंदिवस घट्ट होत असल्याचे गंभीर वास्तव डॉ. गादिया यांनी निदर्शनास आणून दिले.

### डेंगीच्या लक्षणांशी साधर्म्य

» "रुग्णांच्या फुफ्फुसात आणि पोटात पाणी होण्यासारख्या गुंतागुंत निर्माण होत आहेत. ही डेंगीची लक्षणे आता चिकुनगुनियाच्या रुग्णांमध्ये दिसून आली आहेत. प्लेटलेटची संख्या अचानक कमी होणे, हे तर अधिकच भयावह आहे. कारण हे पूर्वी कधीही चिकुनगुनियाचे लक्षण नव्हते. प्लेटलेट्स आता पाच हजारांच्या धोकादायक पातळीपर्यंत घसरत आहेत. यामुळे चिकुनगुनियाचा नवा विषाणू जीवघेणा बनला आहे. पूर्वी चिकुनगुनियाच्या रुग्णांमध्ये प्लेटलेट्स ८०,००० ते ९०,००० च्या खाली गेल्याचे आम्हाला कधीच दिसले नाही. यामुळे रुग्णाला डेंगीची लागण झाली आहे की चिकुनगुनियाची, याचे निदान करताना डॉक्टरांचा गोंधळ उडत असल्याकडे राष्ट्रीय डेंगीतज्ज्ञ आणि केईएम हॉस्पिटलमधील आयसीयू आणि डेंगी विभागाचे प्रमुख डॉ. राजेश गादिया यांनी लक्ष वेधले.

> अर्धांगवायूसोबतच आणखी धक्कादायक लक्षण म्हणजे नाक काळे पडणे. भूतकाळातील चिकुनगुनियाचा या वैशिष्ट्याशी कधीही संबंध नाही. चिकुनगुनियाचे सुमारे ३० टक्के रुग्ण आता उलट्या आणि गॅस्ट्रोच्या लक्षणांसह येत आहेत. हे कधीच झाले नव्हते. हा व्हायरस सतत नवनवीन लक्षणे दाखवत आहे. याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. चिकुनगुनियाचा हा नवीन प्रकार म्हणजे आणखी एक ताप नाही, तर तो जीवघेणा ठरत आहे.
>
> - डॉ. राजेश गादिया, राष्ट्रीय डेंगीतज्ज्ञ आणि आयसीयू.

# इंदिरानगर झोपडपट्टीच्या जागेवर उभ्या राहणार टोलेजंग इमारती

## एसआरएअंतर्गत पालिकेच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसनाचा राज्यातील पहिलाच प्रकल्प

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या जागेवरील गुलटेकडी येथील इंदिरानगर येथील मीनाताई ठाकरे वसाहत या झोपडपट्टीचे 'एसआरए'अंतर्गत त्याच जागेवर पुनर्वसन केले जाणार आहे. येथे झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांसाठी मोठ्या इमारती उभ्या राहणार आहेत.

या जागेवर उभारण्यात येणारा झोपडपट्टी पुनर्वसनाचा हा राज्यातील पहिलाच प्रकल्प असणार असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले. या ठिकाणी तब्बल अडीच हजारांहून झोपड्या असून त्यांचे सर्वेक्षण सुरू झाले असून लवकरच निविदा काढण्यात येणार असल्याचेही स्पष्ट केले.

राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागांवरील झोपडपट्ट्यांचे एसआरए अंतर्गत पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यात प्रथमच एसआरए पुणे महापालिकेसोबत योजना राबवत आहे. या ठिकाणी ४५ मीटरचे टॉवर उभे राहणार आहेत.

दरम्यान, या ठिकाणी एसआरएअंतर्गत पुनर्वसन प्रकल्प राबविण्याचा निर्णय झाल्यानंतर पुणे महापालिकेने स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन या भागातील प्राथमिक सर्वेक्षणदेखील केले आहे. गुलटेकडी येथील नेहरू रस्ता आणि महर्षिनगरच्या मध्ये तब्बल १२ एकर जागेवर मीनाताई ठाकरे इंदिरानगर ही मोठी वसाहत आहे. त्यामध्ये २,५५४ झोपड्या आढळून आल्या आहेत. जागेची मोजणी, डिमार्केशन आदी तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सर्वेक्षण सुरू केले आहे. यापूर्वी एसआरए योजनेसाठी विकसक सर्वेक्षण करायचे. परंतु यंदा प्रथमच महापालिका प्रशासनाने हे सर्वेक्षण सुरू केले आहे.



### 45 मीटर उंचीच्या 12 ते 13 इमारती

» झोपडपट्टीच्या जागेवर टीपी आणि महापालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ते, उद्यान आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरक्षण आहे. या प्रकल्पामुळे या आरक्षणांची जागा मोकळी होणार असून पर्यायी रस्ते उपलब्ध होणार आहेत. प्राथमिक सर्वेक्षणात साधारण अडीच हजार झोपड्या आढळल्या असल्या तरी काही दुमजलीदेखील आहेत. अशा दुमजली झोपड्यांचे २००० पूर्वीचे पुरावे ग्राह्य धरून त्यांची स्वतंत्र नोंदणी करावी लागणार असल्याने संख्या वाढण्याची शक्यता आहे. या ठिकाणी ४५ मीटर उंचीच्या १७-१८ मजली साधारण १२ ते १३ इमारती उभ्या राहतील. निविदेतील अटींनुसार अधिकाअधिक घरे देणाऱ्या आणि निविदांच्या अटी-शर्तींनुसार महापालिकेला मोबदला देणाऱ्या विकसकाला हे काम देण्यात येईल. या बदल्यात विकसकाला टीडीआर, एफएसआय आणि त्याच्या प्रकल्पाच्या विकसनाला जागा उपलब्ध करून देण्यात येईल, असे या प्रकल्पासाठी नेमलेले विशेष अधिकारी सुधीर कदम यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवड शहरात धावताहेत धोकादायक स्कूलबस

**बसची योग्यता तपासणी करून प्रमाणपत्र घेणे आवश्यक ,आरटीओने याबाबत कारवाईचा इशारा देऊनही सध्या जवळपास 1 हजार अयोग्य स्कूलबस धावत आहेत.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसची योग्यता तपासणी करून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. आरटीओने याबाबत कारवाईचा इशारा देऊनही सध्या जवळपास १ हजार अयोग्य स्कूलबस धावत आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी या बसवर कारवाईचा इशारा दिला असला तरी बसचालकांनी याची दखलच घेतलेली नाही. त्यांना वळणावर आणण्यासाठी आरटीओ आणि पिंपरी चिंचवड वाहतूक विभागाने संयुक्त कारवाई करण्याची गरज आहे.

शहरामध्ये जवळपास सातशे ते आठशे खासगी शाळा आहेत. यामध्ये भरमसाठ फी भरून पालक आपल्या पाल्यांना पाठवतात. काही शाळांच्या स्वतःच्या स्कूलबसमधूनच हे विद्यार्थी प्रवास करीत आहेत. या



स्कूलबसकडे योग्यता प्रमाणपत्र, परवाना, विमा आदी महत्त्वाची कागदपत्रे नसून, या धोकादायक बसचा प्रवास मुलांच्या प्राणाशी बेतू शकतो, त्याबाबत स्कूल प्रशासन अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. कारण, आरटीओने वारंवार शाळेला कळवूनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र देताना वाहन योग्य आहे का, रस्त्यावर धावताना त्याचे पार्ट निकामी नाहीत ना, वाहन सुरक्षिततेची हमी देऊ शकते का, लाईट, हॉर्न, ब्रेक योग्य असून त्यातून विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक होऊ शकते का, हे सगळे तपासले जाते. औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळख असलेले पिंपरी-चिंचवड शहर आता शैक्षणिक क्षेत्रातदेखील अग्रेसर होत आहे. त्यामुळे स्मार्ट शाळा उभ्या राहात आहेत.

या शाळांमधून मिळणाऱ्या उच्च दर्जाच्या शिक्षणातून मुलांचे भविष्य घडणार असल्याने पालक काबाडकष्ट घेऊन त्यांना शाळेत पाठवतात. मुलांना वेळेत शाळांमध्ये पाठविण्यासाठी स्कूलबसची सोय करण्यात आली आहे. शहरातील एकूण तीन हजार स्कूलबसपैकी हजाराहून अधिक स्कूलबस रस्त्यावर धावण्यास अयोग्य असल्याची माहिती आहे. या बसमालकांवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने ठोस कारवाई करावी अशी मागणी पालक करत आहेत.

### आरटीओचे नियम धाब्यावर

**» आरटीओचे नियम बसचालक पाळत नसल्याचे दिसून येते. प्रत्येक शालेय स्कूलबस आणि व्हॅनचा रंग पिवळा असणे आवश्यक आहे. मात्र, अजूनही वेगवेगळ्या खासगी आणि मालवाहतूक वाहनातूनही विद्यार्थ्यांची ने-आण केली जाते. एवढेच नव्हे तर, एका स्कूलबसमध्ये ठराविक विद्यार्थी संख्या बसवण्याचा नियम असताना तो नियमही पाळला जात नाही. नियमापेक्षा अधिक विद्यार्थी बसवले जातात.**

### वाहनांची तपासणी

**» आरटीओने जानेवारी ते ऑगस्टपर्यंत साडेसहाशे वाहनांची तपासणी केली. त्यात २४० वाहनांकडून दंड वसूल केला. या माध्यमातून आरटीओला ६३ लाख रुपये मिळाले आहेत .**

## घंटागाडी कर्मचाऱ्यांना मिळाला न्याय, 'हे' कामगार होणार कायम

**न्यायालयाच्या निर्णयाला पिंपरी-चिंचवड महापालिकेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मानधन तत्त्वावर घेतलेल्या घंटागाडी कर्मचाऱ्यांचा महापालिका सेवेत कायम करून घेण्यासाठी मागील २२ वर्षांपासून न्यायालयीन संघर्ष सुरू आहे. त्यांना कायम करण्याच्या औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाला पिंपरी-चिंचवड महापालिकेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आता उच्च न्यायालयाने काही सुधारणा करून घंटागाडी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचेच आदेश दिले आहेत.




महापालिकेच्या आरोग्य विभागात १९९९ पासून घंटागाडी कर्मचारी मानधन तत्त्वावर कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांनी महापालिका सेवेत कायम करावे, यासाठी २००२ मध्ये औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केला. तेव्हापासून हा संघर्ष सुरू असून औद्योगिक न्यायालयाने ३० जानेवारी २०२३ रोजी घंटागाडी कर्मचाऱ्यांना १८ ऑगस्ट २००५ कायम सेवेत घ्यावे.

त्यांना सर्व लाभ द्यावेत.तसेच,त्यांना तेव्हापासूनची फरकाची रक्कम देण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाविरुद्ध महापालिकेने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने नुकताच निकाल दिला. त्याप्रमाणे घंटागाडी कर्मचाऱ्यांना १८ ऑगस्ट २००५ पासून सेवेत कायम समजण्यात यावे. त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करून इतर सर्व लाभ द्यावेत. तर, फरकाची रक्कम ३० जानेवारी २०२३ पासून दिली जावी.

तसेच, आठ आठवड्यानंतर आदेशाची अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे घंटागाडी कर्मचाऱ्यांना सेवेत घ्यावे लागणार आहे, तर फरकाची रक्कम कमी द्यावी लागणार असल्याने पालिकेलाही दिलासा मिळाला आहे. परंतु, पालिका सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> **घंटागाडी कर्मचाऱ्यांसाठी आम्ही २२ वर्षांपासून हा लढा देत आहोत. औद्योगिक न्यायालयानंतर उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करून घंटागाडी कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा. त्यांना प्रशासनाने आणखी संघर्ष करण्यास भाग पाडू नये.**
>
> **- बबन झिंजुर्डे, अध्यक्ष, महापालिका कर्मचारी महासंघ..**

## रहाटणी येथे मूर्तिदान करूया, पर्यावरण जपूया उपक्रम राबवला

**पिंपरी चिंचवड मनपा व गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने उपक्रम**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मनपा आरोग्य विभाग व गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने रहाटणीच्या घाटावर गणेश मूर्तीचे संकलन करण्यात आले.गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारतीताई चव्हाण म्हणाल्या की गणेशभक्त आपल्या घरी भक्तीभावाने गणेशाची पूजा करतात आणि ज्यावेळेस आमच्याकडे मुर्तीदान करण्यासाठी येतात त्यावेळी मूर्ती स्वीकारताना आम्हाला खूप वाईट वाटते कारण बाप्पाला निरोप देताना अनेक भाविक भाऊक झालेले दिसले परत जाताना जड अंतकरणाने मागे वळून बघताना * गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर* बाप्पा निघाले गावाला चैन पडेना आम्हाला, या असे म्हणत भाविक मागे वळून बघत होते.



नदीमध्ये मूर्ती विसर्जित करू नका कृत्रिम हौदात मूर्ती विसर्जन करून नदीपात्राचे प्रदूषण रोखू या अशी कळकळीची विनंती डॉ. भारती चव्हाण यांनी गणेशभक्तांना केली. आम्ही एकाच दिवशी 300.एवढ्या मूर्तीचे संकलन केले असून गणेशाची विधीवत पूजन करून योग्य त्या ठिकाणी विसर्जन केली जाईल ,नागरिकांनी पालिकेने 85 ठिकाणी मुर्तीदान व संकलन केंद्र उभारले आहे त्याच ठिकाणी नागरिकांनी मुर्तीदान करून पर्यावरण पुरक गणोत्सव साजरा करण्याचे आवाहन ग प्रभाग वेळी ह प्रभाग मुख्य आरोग्य आधिकारी उद्धव ढवरी यांनी यावेळी सांगितले. प्लास्टिक व निर्माल्य असे दोन वेगवेगळे बीन त्या ठिकाणी ठेवण्यात आल्याचे ढवरी यांनी सांगितले.

मनपा ग प्रभाग आरोग्य निरीक्षक उमेश कांबळे,मुर्तीसंकनामध्ये मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारतीताई चव्हाण,शहराध्यक्ष बशिरभाई मुलानी, बाळासाहेब साळुंके, महेंद्र गायकवाड,राजेश हजारे, वाघमारे गोरखनाथ,आण्णा जोगदंड, मा.नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, मा.नगरसेवक गोपळ माळेकर,तानाजी एकोंडे, शंकर नाणेकर शिंदे भरत,नंदकुमार धुमाळ, ज्ञानेश्वर मलशेट्टी ,अशोक सरतापे ,इस्माईल मुल्ला, हनुमंत यादव ,शिवाजी पाटील,रघुनाथ फेगडे,पालिकेच्या वतीने विनोद ताठे,मुकादम अरूण राऊत, रितेश स्वराज,पोलीस बांधव सागर काळे,नामदेव वडेकर,किरण कांबळे, अर्पणा कांबळे,शशीकांत कुंजीर इत्यादी कार्यकर्ते उपक्रम राबवित होते.

बशीरभाई मुलानी, बाळासाहेब साळुंखे ,महेंद्र गायकवाड, आण्णा जोगदंड,यांनी उपक्रम राबविण्यासाठी परिश्रम घेतले.

# भक्तांच्या सागराचे कुशल व्यवस्थापन

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळातील स्वयंसेवकाकडून गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन

**पुणे | प्रतिनिधी**

दरवर्षी दहा दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान राज्यातून, देशातून आणि परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक या उत्सवात सहभागी होण्यासाठी आणि शतकाहून अधिक जुन्या संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी पुण्यनगरीत येतात.

दरवर्षी दहा दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान राज्यातून, देशातून आणि परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक या उत्सवात सहभागी होण्यासाठी आणि शतकाहून अधिक जुन्या संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी पुण्यनगरीत येतात. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीसह नामवंत मंडळांना भाविकांची मोठी गर्दी होते आणि भाविकांचा हा महासागर सांभाळणे हे आव्हानात्मक होऊन बसते. तथापि, उत्सवाच्या काही महिन्यांपूर्वीची बारकाईने केलेली तयारी आणि सावधपणे केलेले नियोजन हे कठीण कार्य साध्य करण्यायोग्य बनवते. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाचे स्वयंसेवक सुव्यवस्थित पद्धतीने भाविकांच्या मोठ्या गर्दीला मार्गदर्शन करतात.



सेलिब्रिटी, चित्रपट तारे, राजकारणी आणि समाजाच्या सर्व स्तरातील लोक बाप्पाच्या दर्शनासाठी येतात, परंतु प्रत्येक भक्ताला, त्यांची पार्श्वभूमी काहीही असली तरी बाप्पाच्या मंडपात समानतेने वागवले जाते. प्रत्येक भक्ताला दर्शनासाठी आणि फोटो आणि व्हीडीओ क्लिक करण्यासाठी १५ ते २० सेकंद दिले जातात. दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत अभिषेक होतो. त्यासाठी एक मार्ग बंद करण्यात आला आहे. मात्र, दर्शनासाठीचा दुसरा मार्ग भाविकांसाठी कोणताही अडथळा न होता खुला आहे. ही एक सार्वजनिक पूजा आहे आणि त्यामुळे बाप्पाच्या दर्शनासाठी वर्षभर वाट पाहात असल्याने कोणाचीही गैरसोय किंवा निराशा होऊ नये, हा उद्देश यामागे आहे, असे बालन यांनी नमूद केले.

### उत्सवाची तयारी

» श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाच्या व्यापक तयारीची माहिती देताना मंडळाचे उत्सव प्रमुख आणि मुख्य विश्वस्त पुनीत बालन यांनी सांगितले की, "गर्दी व्यवस्थापन नियोजन एप्रिलपासून सुरू होते. १५ विभाग आणि त्यांचे प्रमुख दहा दिवसांच्या उत्सवासाठी प्रत्येक पैलूची बारकाईने तपासणी करतात. सजावट, आदरातिथ्य, गर्दीचे व्यवस्थापन आणि इतर सर्व बाबी या १५ विभागांनी जबाबदारीने हाताळल्या आहेत."

### प्रभावी गर्दी व्यवस्थापन

» श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाच्या व्यापक तयारीची माहिती देताना मंडळाचे उत्सव प्रमुख आणि मुख्य विश्वस्त पुनीत बालन यांनी पुणे टाइम्स मिररला सांगितले की, "गर्दी व्यवस्थापन नियोजन एप्रिलपासून सुरू होते. १५ विभाग आणि त्यांचे प्रमुख दहा दिवसांच्या उत्सवासाठी प्रत्येक पैलूची बारकाईने तपासणी करतात. सजावट, आदरातिथ्य, गर्दीचे व्यवस्थापन आणि इतर सर्व बाबी या १५ विभागांनी जबाबदारीने हाताळल्या आहेत."

### प्रगत नियोजन

» कार्यक्रमपूर्व नियोजन आवश्यक होते. क्षमता, मांडणी आणि संभाव्य अडथळ्यांची पडताळणी करण्यासाठी उत्सवाच्या ठिकाणाची सखोल पाहणी करण्यात आली. गर्दी व्यवस्थापन योजनांवर चर्चा करण्यासाठी आणि अंतिम रूप देण्यासाठी स्थानिक अधिकारी, पोलीस, कार्यक्रम आयोजक आणि समुदाय नेत्यांच्या बैठका आयोजित केल्या गेल्या.

# अखेर नियोजन समितीला मिळाले कार्यालय

## पीएमआरडीए कार्यालयाच्या तळमजल्यावर मिळाला स्वतंत्र कक्ष, ग्रामीण भागातील विकासकामे लागणार मार्गी

**पुणे | प्रतिनिधी**

महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अंतर्गत विविध ग्रामीण भागातील पायाभूत समस्या आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी नियोजन समिती काम करते. प्राधिकरणातील अधिकारी आणि समितीच्या सदस्यांमध्ये असणारा दुवा दूर झाला असून, येत्या काळामध्ये ग्रामीण भागातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी ही समिती पाठपुरावा करणार आहे. नुकतेच या समितीसाठी स्वतंत्र कार्यालय देण्यात आले आहे. त्याचे कामकाज तिथून होईल.



जिल्ह्यातील नागरीकरण सुनियोजित पद्धतीने व्हावे यासाठी राज्य शासनाने जुलै १९९९ मध्ये पुणे महानगर क्षेत्र घोषित केले. राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य शासनाने पुणे महानगर क्षेत्राची घोषणा केली. राज्य घटनेतील तरतुदी व महाराष्ट्र महानगर नियोजन समितीच्या (रचना व कामे) तरतुदीबाबत नोव्हेंबर २००८ मध्ये पुणे महानगर नियोजन समितीची स्थापना केली होती.

त्यामध्ये पीएमआरडी अंतर्गत ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांची या समितीवर निवड देखील केली होती. या समितीला कामकाज करण्यासाठी अधिकारी कर्मचारी वर्ग व कार्यालयाची आवश्यकता होती. याबाबत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना भेटून याबाबत स्वतः लक्ष घालण्याची विनंतीही केली होती. अखेर उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पीएमआरडीए प्रशासनाला कार्यालय देणे भाग पडले.

पीएमआरडीएच्या प्रशासकीय इमारतीमधील पहिला तळ मजल्यावरील पश्चिम बाजू असलेला कक्ष हा समितीला देण्यात आला. रंगरंगोटी आणि कर्मचारी देऊन ते कार्यालय समितीकडे सुपूर्द करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे समितीला प्रशासकीय यंत्रणेशी संवाद साधण्यासाठी आणि कागदपत्रे व्यवहारासाठी स्वतंत्र एक शिपाई आणि लिपिक देण्यात आलेले आहेत.

### हे प्रश्न लागणार मार्गी

» ग्रामीण भागातील समस्या आणि प्रश्नासाठी ही समिती प्रामुख्याने काम करणार आहे. विकास आराखडा, अंतर्गत रस्ते, घनकचरा, पाणीपुरवठा यासोबतच नागरी प्रश्नांवर आणि त्या संबंधित पाठपुराव्यावर प्रशासकीय पातळीवर चर्चा होणार आहे . त्याचप्रमाणे नदी सुधारणा प्रकल्प त्याचा मसुदा तयार करणे या कामासाठी समिती पाठपुरावा करेल.

"समितीला कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी कार्यालयाची आवश्यकता होती. गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. सध्या किरकोळ फर्निचरची कामे बाकी राहिली आहेत. त्यानंतर येथे कामकाज सुरू होईल

- वसंत भसे, सदस्य, महानगर नियोजन समिती, पुणे.